अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

www.surajyadigital.com । शनिवार, दि. ११ मे २०२४ । ▸ वर्ष : २२ वे ▸ अंक : २२१ वा ▸ किंमत : ५ रुपये ▸ पाने १२

## रवींद्र वायकरांना कारणे दाखवा नोटीस, अपात्रतेची टांगती तलवार?

**हैदराबाद** : शिवसेना शिंदे गटाचे नेते रवींद्र वायकर यांच्यावर गंभीर आरोप करत उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेच्या वतीने कारणे दाखवा नोटीस पाठवण्यात आली आहे. शिवाय, विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्याकडे रवींद्र वायकर यांना अपात्र ठरवण्यासाठी वकील असीम सरोदे यांच्यामार्फत अर्ज करण्यात आला आहे. रवींद्र वायकर यांचे उद्धव ठाकरे यांच्याशी जवळचे संबंध होते आणि शिवसेनेच्या मूळ राजकीय पक्षाशी त्यांचे दीर्घकाळचे संबंध होते. शिवसेनेचे नोव्हेंबर २०२३ मध्ये दोन गटात विभाजन झाल्यापासून वायकर हे उद्धव ठाकरेंच्या पाठीशी ठामपणे उभे असल्याचे दिसले. जोगेश्वरी येथील पंचतारांकित हॉटेलच्या इमारतीशी संबंधित मुंबई पोलिसांच्या आर्थिक गुन्हे शाखेने वायकर यांच्यावर गुन्हा दाखल केला होता.

### आजचा सामना

मुंबई इंडियन्स
विरुद्ध
कोलकाता नाईट रायडर्स

वेळ : रात्री ७.३० वा. स्थळ : कोलकाता

# ११ वर्षांनंतर निकाल; दोन आरोपींना जन्मठेप

## सबळ पुराव्याअभावी तिघे निर्दोष

**पुणे/विशेष प्रतिनिधी**

**पुण्यातील विशेष न्यायालयाकडून महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे कार्याध्यक्ष डॉ. नरेंद्र दाभोलकर हत्या प्रकरणात सचिन अंदूरे, शरद कळसकर यांना दोषी मानून विशेष न्यायाधीश यांनी जन्मठेप सुनावली आहे. तसेच पाच लाखांचा दंडही ठोठावण्यात आला आहे. तर इतर तीन आरोपी डॉ. वीरेंद्रसिंह तावडे, संजीव पुनावळेकर आणि विक्रम भावे यांची सबळ पुराव्याअभावी मुक्तता करण्यात आली आहे. या प्रकरणात ११ वर्षांनी आपला निकाल जाहीर केला आहे. या प्रकरणात एकूण पाच आरोपी होते.**

डॉ. तावडे याचा या गुन्ह्यात हेतू दिसून आलेला आहे. तसेच त्यावर संशय घेण्यासारखी परिस्थिती आहे. मात्र त्यांच्या विरोधात गुन्हा सिद्ध करण्यात पोलीस आणि सरकार पक्ष अपयशी ठरले आहेत. तर भावे आणि पुनावळेकर यांच्या विरोधात देखील सक्षम पुरावे सादर करण्यात पोलिसांना यश आलेले नाही. त्यामुळे या तीनही आरोपींची या गुन्ह्यातून निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे, असे विशेष न्यायाधीशांनी निकालात म्हटले. सचिन अंदुरे आणि शरद कळसकर यांनी गोळीबार केल्याची कबुली दिली आहे. त्यांच्या विरोधातील सक्षम पुरावे पोलिसांनी न्यायालयात सादर केले. त्या आधारे दोघांना शिक्षा सुनावण्यात येत आहे, असे न्यायाधीश जाधव यांनी निकालात नमूद केले आहे.

आरोपी क्र. १ वीरेंद्र तावडे यांच्यावर कटकारस्थान रचल्याचा आरोप होता, त्यांना निर्दोष सोडले आहे. संजीव पुनाळेकर यांनी मारेकऱ्यांना शस्त्र नष्ट करण्याचा सल्ला दिला होता. त्यांनाही निर्दोष मुक्त केले आहे. विक्रम भावे यांनाही निर्दोष मुक्त केले आहे. आरोपी क्र. २ आणि ३ अनुक्रमे शरद कळसकर आणि सचिन अंदूरे यांना भारतीय दंड विधान कलम ३०२ आणि ३४ खाली दोषी ठरविले गेले आहे. त्यांना जन्मठेपेची शिक्षा सुनावण्यात आली असून पाच लाखांचा दंड ठोठावण्यात आला आहे. दंड न भरल्यास एका वर्षांच्या कारावासाची शिक्षा आणखी वाढणार आहे, अशी माहिती सरकारी वकिलांनी दिली. डॉ. नरेंद्र दाभोलकर यांची पुण्यातील ओंकारेश्वर मंदिराजवळील महर्षी विठ्ठल रामजी शिंदे पुलावर २० ऑगस्ट २०१३ रोजी सकाळी सव्वासातच्या सुमारास पिस्तुलातून गोळ्या झाडून हत्या करण्यात आली. सकाळी सव्वासातच्या सुमारास मोटारसायकलवरून आलेल्या दोघांनी त्यांना थांबवले आणि अगदी जवळून पिस्तुलातून गोळ्या झाडल्या. डॉ. दाभोलकर यांच्या हत्येचे वृत्त समजताच महाराष्ट्रासह देशात खळबळ उडाली. पुरोगामी चळवळीतील कार्यकर्त्यांना मोठा धक्का बसला. पुरोगामी महाराष्ट्रात अशा प्रकारे एखाद्या विचारवंताची हत्या होते, हे वास्तव कित्येकांना अस्वस्थ करणारे ठरले.


डॉ.नरेंद्र दाभोलकर हत्या प्रकरण


जन्मठेप | निर्दोष

### नक्षलवादी शक्तींचा पराभव : सनातन

सनातन संस्थेचे राष्ट्रीय प्रवक्ते चेतन राजहंस यांनी प्रतिक्रिया दिली. डॉ. दाभोलकरांच्या हत्येच्या संदर्भात सनातन संस्थेचं निर्दोषत्व सिद्ध झालेलं आहे. देशभरात सनातन संस्थेला बदनाम करण्याचं षड्यंत्र आखलं गेलंय. त्या अर्बन नक्षलवादी शक्तींचा आज पराभव झालाय, असं आम्ही मानतो. कारण ज्या दिवशी डॉ. दाभोलकरांची हत्या झाली होती त्या दिवशीच तत्कालीन मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी याप्रकरणी हिंदुत्ववाद्यांचा हात आहे, असं म्हटलं होतं. या प्रकरणाची दिशा भरकटवण्यात आली होती. राजहंस पुढे म्हणाले, याप्रकरणी सनातन संस्थेच्या विक्रम भावेंना २ वर्षांचा कारावास अकारण भोगावा लागला. तर वीरेंद्र तावडे यांना ८ वर्षं कारावासात राहावं लागलं. तसेच हिंदुत्ववाद्यांचे वकील संजीव पुनाळेकर यांनाही ४२ दिवस कारावासात ठेवण्यात आलं. हिंदुत्ववाद्यांना गोवण्यासाठी हे षड्यंत्र आखण्यात आलं होतं. आज न्यायालयाच्या निकालामुळे हे षड्यंत्र फसलं आहे.

### निर्दोष तिघांविरोधात हायकोर्टात जाणार : मुक्ता दाभोलकर



हत्येचा सूत्रधार मोकाट असून तपास यंत्रणांनी त्याचा शोध घ्यावा असं नरेंद्र दाभोलकर यांच्या कन्या मुक्ता दाभोलकर यांनी म्हटलं आहे. त्याचबरोबर ज्या तीन आरोपींना निर्दोष मुक्त केलं आहे त्यांच्याविरोधात उच्च न्यायालयाचं दार ठोठावणार असल्याचं मुक्ता दाभोलकर यांनी सांगितलं. मुक्ता दाभोलकर म्हणाल्या, पत्रकार गौरी लंकेश हत्या प्रकरणाचा तपास करत असतानाच नालासोपारा येथे तपास यंत्रणांनी २०१८ मध्ये अवैध शस्त्रसाठा पकडला होता. त्याच वेळी नरेंद्र दाभोलकर हत्या प्रकरणातील दोन आरोपी सचिन अंदुरे आणि शरद कळसकर यांनाही पकडलं, तत्पूर्वी २०१३ ते २०१८ या पाच वर्षांमध्ये या हत्या प्रकरणाचा तपास एका टप्प्यावर येऊन थांबला होता. मात्र, आता या हत्या प्रकरणातील दोन्ही शूटर्सना (मारेकरी) शिक्षा सुनावण्यात आली आहे. या तपासात घडलेली ही एक महत्त्वाची गोष्ट आहे.

### जनतेच्या सहवेदनेतून लढण्याचे बळ



कार्यकर्ते, सामान्य व्यक्तीही डॉ. नरेंद्र दाभोलकर यांच्या हत्येने आमच्याएवढेच दु:खी झाले. त्यातूनच खुन्यांविरोधात लढण्याचे बळ आम्हा कुटुंबियांना मिळाले... शिक्षा ठोठावल्यानंतर डॉ. हमिद दाभोलकर आपली वेदना व्यक्त करत असतात.

ही हत्या झाल्यानंतर सामाजिक शोकामुळे हा आघात पचवण्याचे बळ आम्हाला मिळाले. या शोकाला सामाजिक सृजनतेचे कोंदण मिळाले. त्यातूनच डॉ. दाभोलकर यांनी स्थापन केलेल्या महाराष्ट्र अंधश्रध्दा निर्मुलन समितीचे कार्य सुरू राहिले. माझ्या वडिलांनी हाती घेतलेल्या कार्यात धोका असल्याचे आम्हाला जाणवत होतेच. पण अशा पध्दतीने झालेला हल्ला आणि तोही महाराष्ट्रात त्यामुळे वेगवेगळ्या पध्दतीचे धक्के बसले. सुरवातीपासूनच आमच्या मनात हा हल्ला विचार, तत्वज्ञान आणि संघटनेवरचा हल्ला आहे, याबाबत आमच्या मनात कोणतीही शंका नव्हती. केवळ आमच्या कुटुंबातील होते म्हणून नव्हे तर आम्हाला ती तत्वे पटली असल्याने आम्ही त्यांच्या तत्वांनुसार जगत होतो. आपला लढा ज्या शक्तीसोबत आहे, त्यात आपली सारी शक्ती एकवटून लढावे लागणार याची आम्हाला कल्पना होती आणि त्यामुळे ही घटना घडल्यानंतर आम्हाला आमच्या झालेल्या व्यक्तीगत नुकसानीबाबत विचार करायला फार वेळ मिळाला नाही. हे केवळ आमचे व्यक्तीगत नुकसान नव्हते तर अनेक कार्यकर्ते आणि सामान्य नागरिकांचे मोठे नुकसान होते. त्यांना त्यांच्याच कुटुंबातील कोणी तरी गेल्यासारखे वाटत होते. डॉ. नरेंद्र दाभोलकर यांच्या विचारांनी आणि कार्याने त्यांच्या जीवनात मोठा फरक पडला होता. समाजाच्या मोठ्या वर्ग आमच्यासोबत दु:खी झाल्याने आम्ही व्यक्तीगत दु:खातून सावरण्याचे आम्हाला बळ मिळाले. आम्ही एकटे नाही आहोत अशी भावना आमच्यात निर्माण झाली. त्याचवेळी मानसिक आरोग्य क्षेत्रात त्याचवेळी कार्यरत झालो त्याचाही मला व्यक्तीगत आणि माझ्या कुटुंबियांना आणि निकटवर्तीयांना लाभ झाला.

आम्ही आमच्या भावनांवर सृजनात्मक प्रयत्नांनी मात केली. जसे की अतुल पेठेने रिंगण या नाटकाची निर्मिती केली. मला आठवतंय, अतुल त्यावेळी म्हणाला होता, जर त्यांनी एक व्यक्ती मारला आम्ही एक नाटक लिहू आम्हि एक कविता लिहू. मला वाटतंय आपल्या वेदनेला सृजनात्मक रुप देण्याने व्यक्ती आणि समाज पुढे जात असतो.

अंधश्रध्दा निर्मुलनासाठी क्रोधापेक्षा करुणेची आणि उपहासापेक्षा आपुलकीची गरज असते, असं डॉ दाभोलकर म्हणत असत. गेली तीन दशक कार्यरत असणाऱ्या अंनिसची हेच तत्वज्ञान आहे, अशी डॉ. दाभोलकरांची श्रध्दा होती. त्याच भूमिकेने अंनीसची वाटचाल सुरू राहील.

## ५० हजारांची लाच घेणाऱ्या पोलीस नाईकाला रंगेहाथ अटक

**सुराज्य/सोलापूर**

अपघात प्रकरणात वाहन ताब्यात न घेणे आणि आरोपी न करण्यासाठी १ लाख रुपयांची लाच मागून तडजोडीअंती ५० हजाराची लाच घेताना पोलिस नाईक वैजिनाथ संदिपान कुंभार (वय ५२ रा. अर्थव बिल्डींग, पुजारी सिटी, इसबावी, पंढरपूर) याला लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी रंगेहाथ पकडले. यामुळे ग्रामीण पोलिस दलात खळबळ माजली आहे.

या प्रकरणी पंढरपूर पोलिस शहर ठाण्यात भादवि कलम २७९, ३३७, २२८ व मोटार वाहन अधिनियम १९८८ चे कलम १३४ अ, १३४ ब, १७७ ,१८४ अन्वये अज्ञात व्यक्तिविरूध्द अपघात प्रकरणी गुन्हा दाखल झाला होता. या गुन्ह्यात तक्रारदार याची मोटार सायकल न दाखविण्यासाठी तसेच या गुन्ह्यात तक्रारदार यांना आरोपी न करण्यासाठी, पंढरपूर शहर पोलिस ठाण्यातील पोलिस नाईक वैजिनाथ कुंभार याने १ लाख रूपये लाचेची मागणी केली होती. त्यानंतर तडजोडीने ५० हजार रूपये लाच देण्याचे ठरले. तक्रारदार याने सोलापूर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाशी संपर्क करून रितसर तक्रार नोंदविली. याची खातरजमा करून लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने पंढरपूर शहर पोलिस ठाणे येथे दि. १० मे रोजी सापळा लावला. या सापळ्यात पोलिस नाईक वैजिनाथ कुंभार हा ५० हजाराची लाच घेताना, लाचलुचपत विभागाच्या जाळ्यात अलगत अडकला. या प्रकरणी आरोपी, पोलिस नाईक वैजिनाथ कुंभार याच्या विरूध्द तो ज्या पोलिस ठाण्यात काम करित होता. त्याच पोलिस ठाण्यात त्याच्याविरूध्द गुन्हा दाखल झाला आहे.



ही कामगिरी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे पोलिस उपअधिक्षक गणेश कुंभार यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस निरीक्षक उमाकांत महाडीक, हवालदार अतुल घाडगे, सलीम मुल्ला, पोलिस नाईक स्वामीनाथ जाधव, चालक पोलिस कॉन्स्टेबल शाम सुरवसे यांनी पार पाडली. या घटनेने जिल्हा पोलिस दलात खळबळ उडाली आहे. याची चर्चा दिवसभर सुरू होती.

## कपडे धुण्यासाठी गेलेल्या दोन मुलींचा पाण्यात बुडून मृत्यू

**म्हैसलगी येथील घटना**

**सुराज्य/अक्कलकोट**



म्हैसलगी (ता.अक्कलकोट) येथे भिमा नदीपात्रात कपडे धुण्यासाठी आईसोबत गेलेल्या दोन मुलींचा पाण्यात बुडुन मृत्यू झाला. आरती भिमराव निकंबे (वय १४) व रुपाली कुमार माने (वय ८) असे मयत झालेल्या दोन मुलींची नांवे आहेत. किरण भिमराव निकंबे (वय २४) यांनी दक्षिण पोलीस स्टेशनमध्ये फिर्याद दिली आहे.

शुक्रवारी (दि.१०) दुपारी दीडच्या सुमारास किरण यांची मोठी बहीण शोभा कुमार माने, लहान बहीण आरती व भाची रुपाली असे तिघी घराशेजारीच असलेल्या भिमा नदीच्या पात्रात कपडे धुण्यासाठी गेल्या. कपडे धुवत असताना रुपाली ही खेळत पाण्यात गेली आणि बुडू लागली. तिला वाचवण्यासाठी आरती पाण्यात गेली तीही बुडू लागली. त्यावेळी शोभाने आराडाआरोडा केला. किरण, सिद्धाराम बऱ्हाणपुरे, दशरथ शिंगे, अनिल कोळी, कोंडीबा भुई हे नदीजवळ आले. दोघांनी पाण्यात उडी मारून आरती व रुपालीला बाहेर काढले.

त्यांना उपचाराकरीता ग्रामीण रूग्णालयात नेण्यात आले. डॉक्टरांनी त्या दोघी उपचारापूर्वीच मयत झाल्याचे सांगितले. किरण यांची बहीण शोभा कुमार माने हीची मुलगी रुपाली ही लहानपणापासुनच म्हैसलगी येथे मामाकडेच राहत होती. शोभा यात्रेकरीता म्हैसलगी येथे आली होती. अधिक तपास हवालदार धायगोडे हे करीत आहेत.



## अक्षय्यतृतीयेला सोलापुरात कोट्यवधींची उलाढाल

सोने, वाहन खरेदीकडे नागरिकांचा कल...

**सुराज्य/सोलापूर**

साडेतीन मुहूर्तापैकी एक असणाऱ्या अक्षय्यतृतीयेनिमित्त सोलापूरच्या बाजारपेठेत शनिवारी कोट्यवधींची उलाढाल झाली. सराफ बाजार, वाहन खरेदी, इलेक्ट्रॉनिक्सची दुकाने ग्राहकांच्या गर्दीने बहरली होती. विशेष म्हणजे अक्षय्य तृतीयेच्या दिवशी सोने खरेदीला महत्त्व असल्यामुळे सुवर्ण अलंकार खरेदीसाठी महिलांची तोबा गर्दी झाली होती.

शहर परिसरात मोठ्या बांधकाम व्यावसायिकांच्या योजना आल्याने जागा आणि घरामध्ये गुंतवणूक करण्याकडे यंदा कल दिसून आला. एका दिवसात तब्बल ५० कोटींची उलाढाल झाल्याची माहिती आहे. अक्षय्य तृतीयेच्या शुभ मुहूर्तावर सोने खरेदीला अधिक महत्त्व दिले जाते. त्यामुळे अन्य बाजारपेठेपेक्षा सराफ बाजारात ग्राहकांची अधिक गर्दी दिसून आली. अक्षय्यतृतीयेच्या मुहूर्तावर खरेदी केलेल्या सोन्याची वृध्दी होते, असे मानले जाते. उन्हाचा तडाखा कमी झाल्यानंतर ग्राहक खरेदीसाठी बाहेर पडल्याने सराफ बाजारात गर्दी दिसून आली. हजारो नव्या गाड्या रस्त्यावर धावल्या. सोलापुरातील चव्हाण, राहुल ह्युंदाई, चव्हाण ॲटोमोबाईल्स, आहेरकर बजाज, कायझन होंडा, लक्ष्मी टोमोबाईल्स, सिद्धी सुझुकी, गांधी टीव्हीएस, टोयाटो अशा विविध कंपन्यांच्या वाहन विक्रेत्यांकडून वाहनांची विक्री मोठ्या प्रमाणात झाली.

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



हमने जीना सिख लिया

कल्याण
668-01-489

मुंबई
358-67-359

## सोलापूरसाठी उजनी धरणातून पाच टीएमसी पाणी सोडण्यास प्रारंभ

**सुराज्य/सोलापूर**

**यंदाच्या प्रखर उन्हाळ्यात उजनी धरणातील असलेला मृत पाणीसाठा निम्म्यावर असताना सोलापूर शहरासह पंढरपूर, मंगळवेढा आणि सांगोला भागाची पिण्याच्या पाण्याची निकड पाहून शुक्रवारी धरणातून भीमा नदीवाटे पाणी सोडण्यास प्रारंभ झाला. हे सोडलेले पाणी सोलापूरजवळील औज आणि चिंचपूर बंधाऱ्यांमध्ये पोहोचायला दहा दिवस लागतील.**

सकाळी ९.३० वाजता १५०० क्युसेक विसर्गाने तर दुपारी अडीच वाजता २५०० क्युसेक विसर्गाने धरणातून नदीत पाणी सोडण्यात आले. त्यानंतर सायंकाळी सहा वाजता विसर्ग सहा हजार क्युसेकपर्यंत विसर्ग वाढविण्यात आला, असे उजनी लाभक्षेत्र विकास प्राधिकरणाचे अधीक्षक अभियंता धीरज साळे यांनी सांगितले.



यंदाच्या वर्षी उजनी धरणातील पाणीसाठ्याची स्थिती शोचनीय आहे. मागील पावसाळ्यात अत्यल्प पाऊस झाल्यामुळे धरणात ऑक्टोंबरपर्यंत ६०.६६ टक्क्यांपर्यंत पाणीसाठा होणे शक्य झाले होते. परंतु त्यानंतर धरणातील पाणी वाटप नियोजन कोलमडल्यामुळे हिवाळ्यातच म्हणजेजानेवारी महिन्यातच धरणातील पाणीसाठी मृत साठ्यात आला होता. धरणात ६३ टीएमसीपर्यंत पाणीसाठा आला तर तो मृत साठा मानला जातो. या साठ्यातील पाणी केवळ पिण्यासाठी राखीव असते. सध्या धरणात जेमतेम वजा ४५ टक्के पाणीसाठा शिल्लक असतानाच सोलापूरसह पंढरपूर, मंगळवेढा आणि सांगोल्याची तहान भागविण्यासाठी तीव्र निकड पाहून धरणातून पाच टीएमसी पाणी सोडले जात आहे. त्यामुळे धरणात येत्या दहा दिवसांत पाणीसाठा वजा ५५ ते ६० टक्क्यांपर्यंत खालावण्याचा अंदाज वर्तविण्यात येत आहे.

## सलगर येथील शेतकऱ्याच्या खून प्रकरणी दोघे ताब्यात

**पाच दिवसाची पोलीस कोठडी**

**अक्कलकोट** : तालुक्यातील सलगर येथील शेत शिवारात पाच दिवसांपूर्वी झालेल्या २७ वर्षाच्या तरुण विवाहित शेतकरी खून प्रकरणातील दोन आरोपींना पोलिसांनी चार दिवसांनी गुरुवारी सायंकाळी शेगांव गावात अटक केली. त्यांना अक्कलकोट न्यायालयात हजर केले असता पाच दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे.

भिमाशंकर श्रीकांत पोलासे (वय २७ वर्षे, रा. सलगर ) असे खून झालेल्या युवकाचे नांव होते. उमेश मलप्पा पोलासे ( वय ३५), सुरेश मलप्पा पोलासे ( य ३२, दोघे रा.सलगर ) यांना अटक केली. मलप्पा पोलासे हा अद्याप फरार आहे. सोमवारी (दि.६) तिन्ही आरोपींनी हत्याराने लाकडाने व पाईपने वार करून भिमाशंकरचा खुन केला. या प्रकरणी त्याच्या वडिलांनी फिर्याद दिली होती. पोलीस निरीक्षक राजेंद्र टाकणे यांच्या मार्गदर्शनाखाली तीन पथके नेमली होती. पेट्रोलींग करीत असताना दोघांना ताब्यात घेतले.

ही कामगिरी एपीआय. निलेश बागाव, एएसआय. धनाजी खापरे, हवालदार महादेव चिंचोळकर, विकास पवार, प्रमोद शिंपाळे शिवलिंग स्वामी, महादेव शिंदे यांनी परिश्रम घेतले.